# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक ६७ वा ❑ गुरूवार दि.१७ एप्रिल २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## ऑस्ट्रेलियाचा ९५% भाग निर्जन का आहे?


– प्रा डॉ सुधीर अग्रवाल


**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

ऑस्ट्रेलिया हा जगातील सहाव्या क्रमांकाच्या मोठ्या देशांमध्ये समाविष्ट असलेला देश आहे. हा जगातील सर्वात लहान खंड आहे. क्षेत्रफळाच्या दृष्टीने ते इतके मोठे असूनही, त्यात खूप कमी लोक राहतात. जर अहवालावर विश्वास ठेवायचा असेल तर, आपली राजधानी दिल्लीची लोकसंख्या ऑस्ट्रेलियापेक्षा जास्त आहे. क्षेत्रफळाच्या बाबतीत, ऑस्ट्रेलिया भारतापेक्षा अडीच पट मोठा आहे. तुम्हाला माहिती आहे का की इतका मोठा प्रदेश असूनही, ऑस्ट्रेलियाचा ९५% भाग निर्जन आहे. पण याचे कारण काय आहे?

हवामान:

ऑस्ट्रेलियाचा बहुतांश भाग वाळवंट आहे, जिथे तापमान ५० अंश सेल्सिअसपेक्षा जास्त आहे. पावसाचे प्रमाणही खूप कमी आहे, ज्यामुळे येथील परिस्थिती मानवी वस्तीसाठी कठीण बनते.

भौगोलिक स्थान:

ऑस्ट्रेलियाचा बहुतांश भाग हा एक खंड आणि एक बेट देश आहे. हे पॅसिफिक आणि हिंदी महासागरांनी वेढलेले आहे, ज्यामुळे बहुतेक परिसर वाळवंट बनतो.

जमिनीची सुपीकता:

येथील जमीन ५ लाख वर्षांहून अधिक जुनी आहे, त्यामुळे तिची सुपीकता कमी झाली आहे आणि बहुतेक भाग नापीक झाला आहे.

लोकसंख्येची घनता:

ऑस्ट्रेलियाची बहुतेक लोकसंख्या किनारी भागात केंद्रित आहे, जिथे हवामान आणि जमीन अधिक अनुकूल आहे.

एकूणच, ऑस्ट्रेलियाचा ९५% पेक्षा जास्त भाग मानवी वस्तीसाठी अयोग्य आहे, कारण तेथील हवामान, भूरचना आणि जमिनीची सुपीकता यामुळे ते कोरडे आणि नापीक बनते.

ऑस्ट्रेलियाचे लोक कोस्टल रेग्युलेशन झोनजवळ राहतात. अहवालांनुसार, या खंडात राहण्यासाठी आलेले पहिले लोक आशियातील मूळ रहिवासी होते. यानंतर अमेरिका आणि युरोपमधील लोक येथे आले. तरीही या देशाची लोकसंख्या फक्त २ कोटी ६० लाख आहे. ऑस्ट्रेलियामध्ये राहण्यासाठी जागा नाही असे नाही, परंतु त्यातील जवळजवळ ९५% जागा रिकामी आहे. एवढेच नाही तर येथे काही शहरे अशी आहेत जिथे फक्त ५० ते १०० लोक राहतात. ऑस्ट्रेलियन सरकारला येथील लोकसंख्या वाढवायची आहे, पण लोकांना निर्जन शहरांमध्ये राहायचे नाही.

ऑस्ट्रेलियाची भूमी तीन भागात विभागली गेली आहे.

पहिला पश्चिम पठार आहे, जो ऑस्ट्रेलियाच्या तीन भागांना व्यापतो. त्याच्या दोन तृतीयांश क्षेत्रफळ वाळवंटाने व्यापलेले आहे, म्हणूनच येथे मानव राहू शकत नाही. त्याच्या दुसऱ्या भागाला मध्य सखल प्रदेश म्हणतात. हा पिवळा भाग एक सखल प्रदेश आहे, जिथे नद्यांचे पाणी खारे आहे. असे पाणी मानवांसाठी आणि शेतांसाठी चांगले नाही. तिसरा भाग पूर्व हाईलँडचा आहे. या भागात पर्वत आणि जंगले दोन्ही आहेत, मुळात ते एक भूभाग आहे. येथील जमीन सुपीक आहे आणि पिण्याचे पाणीही आहे. पण इथे राहणे लोकांना कठीण होत चालले आहे.

# ग्रामीण मातीशी घट्ट नाळ जुळलेले प्रा.मिलिंद जोशी साहित्य महामंडळावर

**ज्योतिर्मय 📖 सराहित्य**

**पुणे** – ग्रामीण मातीशी प्रारंभापासून जुळलेले नाते सातत्याने घट्ट ठेवणारे लाडके साहित्यिक प्राध्यापक मिलिंद जोशी सर यांची साहित्य महामंडळाच्या अध्यक्षपदी नुकतीच अभिनंदनीय निवड झाली आहे. या निवडीचा ग्रामीण भागातील साहित्यिकांना साहित्यप्रेमींना मनस्वी आनंद झाला आहे. बार्शीजवळच्या छोट्या खेडेगावातून पुण्यात येऊन साहित्य क्षेत्राच्या सर्वोच्चपदी विराजमान होण्याचा बहुमान प्राध्यापक मिलिंद जोशी सरांना त्यांच्या अविरत साधनेतून अभ्यासातून आणि अमोघ चिंतनशील वक्तृत्वामुळे मिळाला आहे. त्यांचा लोकसंग्रह मित्र संग्रह अफाट आहे. देशभर त्यांचा मित्रपरिवार आहे. महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे या आद्यसंस्थेचे अध्यक्षपद सरांनी खूप काळ भूषविले आहे. या काळात महाराष्ट्र साहित्य परिषदेचे रूपच त्यांनी पालटले आहे. महाराष्ट्र साहित्य परिषद खऱ्या अर्थाने समाजाभिमुख केली आहे. सरांच्या अध्यक्षपदाच्या कालावधीमध्ये शंभरावे साहित्य संमेलन संपन्न होणार आहे. हा एक सुवर्णयोगच आहे. ग्रामीण भागातल्या साहित्यिकांना सरांनी नेहमीच प्रोत्साहन देऊन लिहिते केले आहे. बळ दिलेले आहे. आपल्या चिंतनशील भाषणांनी सरांनी अवघ्या महाराष्ट्राचे प्रबोधन केले आहे. साहित्य रुची वाढविली आहे. सरांचे हात आभाळाला टेकले असले तरी त्यांचे पाय मात्र शेतीमातीशी घट्ट राहिलेले आहेत. ग्रामीण भागातील आमचा माणूस अध्यक्ष झाल्याची भावना सर्व साहित्यिकांच्या



मध्ये आहे. प्रा. मिलिंद जोशी सर अध्यक्ष होणं हा एक साहित्य क्षेत्रातील ऐतिहासिक सुवर्णमयी क्षण आहे किंवा घटना आहे. साहित्य संमेलनाच्या अध्यक्षाची निवड सर्वानुमते निवडणुकी शिवाय करण्याचा त्यांचा निर्णय खरंतर ऐतिहासिक आहे. गुणवत्ता असूनही अध्यक्षपद न मिळणाऱ्या साहित्यिकांचा त्यामुळे बहुमान होतो आहे. याचे सारे श्रेय प्राध्यापक मिलिंद जोशी सरांनाच आहे. मिलिंद जोशी सरांच्या अध्यक्षीय निवडीने तमाम साहित्यिकांना मनस्वी आनंद झाल्याची भावना निर्माण झाली आहे. साहित्य क्षेत्रात आनंद पसरला आहे. आणखी नव्या नव्या उपक्रमांचा शुभारंभ होण्यास सुरुवात झाली आहे. प्राध्यापक मिलिंद जोशी सरांचा तीन वर्षाचा कालावधी सुवर्णमयी होणार, चिरस्मरणीय होणार ऐतिहासिक होणार यात शंका नाही. प्रा मिलिंद जोशी सरांचे मनापासून हार्दिक हार्दिक अभिनंदन !! त्यांना त्यांच्या भावी कार्यासाठी आभाळभर शुभेच्छा !!!

# णमोकार तीर्थ प्रचार रथ २५ शहरात फिरणार

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर** – प.पू. आचार्य श्री देवनंदीजी गुरुदेव यांच्या प्रेरणेने नाशिक जिल्हयातील मालसाने येथे निर्माणाधीन णमोकार तीर्थाचा प्रचार रथ भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सवा निमित्त २५ शहरात फिरणार आहे. दरवर्षी जैन समाजातर्फे भ. महावीर जन्मकल्याणक महोत्सव मोठ्या धूमधडाक्यात साजरा केला जातो. यानिमित्त प्रत्येक शहरात शोभायात्रा काढली जाते. यामध्ये विविध रथ शामिल होतात.

६ ते १३ फेब्रुवारी २०२६ रोजी णमोकार तीर्थाचा भव्य पंचकल्याणक महोत्साव संपन्न होणार आहे. त्या कार्यक्रमाची माहिती जनसामान्यांना व्हावी या उद्देश्याने प्रचार रथ बनविण्यात आले आहे. प्रथम प्रचार रथाचा उदघाटन पु.पू. आचार्य श्री देवनन्दिजी गुरुदेव एवं आचार्य श्री कुमूदनंन्दिजी गुरुदेव, मुनिश्री आर्षिकतीर्जी गुरुदेव यांच्या सानिध्यात णमोकार तीर्थ येथे झाला. तसेच छत्रपती संभाजीनगर येथे अशाच प्रकारच्या रथाचे लोकार्पन शहराचे पालकमंत्री संजय शिरसाठ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मा.

न्या.कैलास चांदीवाल व माजी महापौर विकास जैन, गुरभक्त परिवाराचे ललीत पाटणी यांची उपस्थिती होती. ६ ते १३ फेब्रवारी २०२६ रोजी दरम्यान होणा-या पंचकल्याणक महोत्सव हा कार्यकम आंतरराष्ट्रीय स्तरावर होणार असुन या महोत्सवाचे प्रचार प्रसार व्हावा यासाठी या रथाची निर्मीती करण्यात आली आहे. सदर रथ महाराष्ट्रात नाशिक, संभाजी नगर, कोपरगांव, नांदगाव, मालेगांव, कन्नड, सोलापुर, नांदेड, कोल्हापुर, अकलूज,पुणे, औंढा, पैठण, सहिते अनेक शहरात एकाच वेळी फिरणार आहे. अशी माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी एका पत्रकाव्दारे दिली.

छत्रपती संभाजीनगर येथील प्रचार रथाच्या लोकार्पन वेळी आचार्य देवनंदीजी गुरभक्त परिवाराचे नमोकार तिर्थाचे विश्श्वस्थ ललीत पाटणी, रवि पहाडे, विपीन कासलीवाल, देवेन्द्र



काला महेंद्र ठोले, जितेद्र पहाडे, प्रकाश ठोले, मानिकचंद गंगवाल प्रकाश कासलीवाल डॉ.आर.सी.बडजाते, नरेंद्र अजमेरा, पियुष कासलीवाल, वर्धमान बाकलीवाल, मनोज दगडा, विनोद लोहाडे, महावीर सेठी,एम. आर.बडजाते, डॉ.रमेश बडजाते,शैलेश पाटणी, भरत ठोले आर.आर.पहाडे, निलेश काला, मनोज पाटणी, बाहुबली गंगवाल, शैलेश पाटणी,श्री.क्षेत्र कचनेर चे अध्यक्ष सुनिल पाटणी, राजु चांदीवाल, संतोष कासलीवाल, मनोज चांदीवाल, महावीर गगवाल, सुनिल सेठी, वर्धमान कासलीवाल, महावीर कासलीवाल, जीवन गंगवाल, प्रकाश लोहाडे, विजय कासलीवाल, मनोज काला, मुकेशे कासलीवाल, दिलीप कासलीवाल, अमित कासलीवाल, हेमंत गंगवाल, भिकचंद लोहाडे, अनिल कासलीवाल आदींची यावेळी उपस्थिती होती. अशी माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी एका पत्रकाव्दारे दिली.

# अक्षय तृतीया : केवळ पुजापाठ नको, कर्तृत्वही हवं

**ज्योतिर्मय 📖 सराहित्य**

अक्षय तृतीया भारतात मोठ्या उत्साहानं साजरा होणारा सण आहे. हा सण हिंदूंचाच नाही तर जैन लोकही या सणाला मोठ्या उत्साहानं साजरा करतात.नव्हे तर या पाठीमागे एक पुरातन परंपरा आहे. या दिवसाला साजरा करण्यामागे काही पुरातन परंपरा खालीलप्रमाणे

या दिवशी भगवान परशुरामाचा जन्म झाला. तोच विष्णुचा सहावा अवतार मानला जातो. या दिवशी परशुराम जयंती साजरी करण्याच्या दृष्टीने या दिवसाचे महत्व आहे. गंगा नदीही याच दिवशी भगीरथाने पृथ्वीवर आणली. तसेच या दिवशी गंगेत स्नानाचे महत्व आहे. हिंदू पुराणानुसार याच दिवशी अन्नपूर्णा मातेचाही जन्मदिवस मानला जातो. त्यामुळे या देवीला प्रसन्न करण्यासाठी वेगवेगळे पदार्थ या दिवशी बनवून ते अन्नपूर्णा देवीला चढवले जातात. याच दिवशी कुबेराने जास्त धन प्राप्ती व्हावी म्हणून शिवपुरम येथे भगवान शिवाची पुजा केली. याच दिवशी महर्षी वेद व्यास यांनी महाभारत कथा लिहिण्यास प्रारंभ केली. याच दिवशी युधीष्ठराला अक्षय पात्राची प्राप्ती झाली. ज्या पात्राने तो गरीबांना अन्न चारत असे. याच दिवशी दु:शासनाने द्रौपदीचे चिरहरण केले व याच दिवशी भगवान श्रीक्रिष्णाने कधीही न संपणारी अक्षय साडी द्रौपदीला पुरवली. याच दिवशी सुदामा क्रिष्णाचा मित्र क्रिष्णाला मदत मागायला द्वारकेला आला.याच दिवशी ओरीसामध्ये शेतीत वखर चालवला जातो. आणि याच दिवशी बंगालमध्ये व्यापारी वहीखात्याचा हिशोब करतात. ज्याला हलखता म्हणतात.

पंजाबमध्ये तर याच दिवशी सकाळी उठून शेतकरी शेतात जातात. त्यांना रस्त्यात जे जे पशुपक्षी भेटतात. त्यावरुन पावसाचा अंदाज लावला जातो. जैन धर्मामध्ये तर या दिवसाला वेगळे महत्व आहे.जैन राजा ऋषभदेव याने आपली संपत्ती आपल्या एकशे एक पुत्राला दान देवून तो सुखप्राप्तीसाठी अरण्यात गेला. त्या काळात त्याने वर्षभर उपवास ठेवला. त्यामुळे त्याचा उपवास सोडण्यासाठी कोणी या राजाला कपडे लत्ते, कोणी घोडे, कोणी हत्ती, तर कोणी राजकन्याही दान दिल्या. पण राजा काही उपवास सोडायला तयार नव्हता. शेवटी अंतर्यामी राजा श्रेयांशस यांनी अंतर्ज्ञानाने ऋषभदेवाची इच्छा ओळखली व त्यांना याच दिवशी उपवासाला उसाचा रस दिला. याला जैन धर्मात पारणाा म्हणतात.

आज लोक वास्तववादी जगत असले तरी त्या वास्तव्यवादी जगण्यात पौराणिकतेची जोड आहे. म्हणूनच आम्ही कितीही वास्तविकतेला मानत असलो तरी नाईलाजानं आमचे सण उत्सव साजरे करीत असतो. बौद्ध मंडळी बैशाखी,





बुद्धपौर्णीमा मोठ्या उत्साहानं साजरी करतात. तर हिंदू दिपावली,होळी, दसरा इत्यादी सण साजरा करतात. मुस्लीम ईद साजरी करतात. ख्रिश्चन नाताळ आणि इस्टरडे. यापैकी अक्षय मात्यापित्यांच्या पुजणाचा एक दिवस म्हणून अक्षय तृतीयाही साजरा केला जातो.

वर्तमानकाळात अक्षयतृतीयेला केवळ माय बापाचीच पुजा करणे तसेच आपआपल्या पिढीत जे पुर्वज झाले. त्यांना पात्रावळीत सुग्रास अन्न टाकून त्यांचं पुजन करणे बस एवढाच अर्थ घेतला आहे.हे पित्तरांना दिलेले जेवण कदाचित या दिवशी केलेले पुण्य कधीच संपत नाही, या अर्थानं हा सण साजरा केला जातो. तसेच ते पुण्यात्मे आशीर्वाद देतात या अर्थानेंही या दिवसाचे महत्व आहे. या दिवशी


अंकुश शिंगाडे
नागपूर
९३७३३५९४५०


कावळ्यांना काव काव ये असा आवाज देवून कावळ्यांना जेवण घालण्याचे महत्व आहे.कावळा अन्नाला शिवला की बस आपले पित्तरं जेवले व आपल्याला पुण्य मिळाले असाही एक समज प्रचलित आहे.

आम्ही जीवंतपणी म्हाता-या मायबापाला वृद्धाश्रमात टाकतो आणि मेल्यावर त्यांची पुजा करतो.सगळे पदार्थ पात्रावर टाकण्यासाठी बनवतो. त्यातच एखाद्या कावळ्याला भूक लागली आणि तो त्या पात्राला शिवलाच तर तो परीवार पुण्य परीवार असे आम्ही समजतो. यात कावळ्याचा आणि पुण्याचा संबंध आला कुठून ? वर्षभर ज्या कावळ्याला हाकलतो, कापतो, तोच कावळा या दिवशी देव कसा? तरीही त्याला देव मानत आम्ही आमची संस्कृती जोपासतो. कारण आमचे आमच्या संस्कृतीवर प्रेम आहे. मग ज्या अर्थाने आमचे आमच्या संस्कृतीवर प्रेम आहे. त्याच अर्थाने आमचे आमच्या मायबापावर प्रेम का नाही? आम्ही आमच्या मायबापावरही प्रेम करावे, त्यांना वृद्धावस्थेत त्रास देवू नये. जीवंतपणीच त्यांची फार सेवा करावी. मेल्यानंतर कोण पाहते. तरंच अक्षयतृतीयेला पुण्य घडेल. नाहीतर कितीही सुग्रास अन्न पित्तराच्या पात्रावर चढवाल. कितीही कावळे ते अन्न खातील. तरी तुम्हाला पुण्य लाभणार नाही.कारण पाप आणि पुण्य ह्या एका नाण्याच्या दोन बाजू आहेत.

मायबापाच्या सेवेचे महत्व तुमच्या पुराणातही सापडतात.ज्या महाभारत रामायणाला तुम्ही मानता, त्याच रामायणात मायबापाच्या सेवेचे दृष्टांत दिलेले आहेत. काशीला मायबापाची कावळ घेवून जाणारा श्रवण बाळ रामायणातीलच. तसेच पित्याला व मातेला दिलेले वचन पाळून चौदा वर्ष वनवास भोगणारा राम रामायणातीलच. त्याही वरती जावून ज्या क्रिष्णाला जगात मानाचं स्थान आहे.त्या महाभारताची सुरुवात पाहिली का कधी. नसेल माहीत तर माहीती करुन घेवू.राजा शांतनूच्या दोन राण्या. गंगा आणि सत्यव्रती. भीष्म गंगेचा पुत्र.राजा शांतनूने भीष्माला युवराज घोषीत केलं.तेव्हा राणी सत्यव्रती नाराज झाली. तुमच्या पहिल्या पुत्राला राजगादी आणि मी मात्र दासी.मला दासत्व का? याच दासत्वासाठी माझ्याशी विवाह केला का म्हणून राणी शांतनुला सोडून गेली. ही गोष्ट भीष्माला माहीत होताच त्याची मातृपितृभक्ती जागृत झाली व त्याने कधीही विवाह न करण्याची प्रतिज्ञा केली. तीच भीष्मप्रतिज्ञा होय.या भीष्मप्रतिज्ञेच्या बदल्यात शांतनूने देवव्रताला(भीष्माला) इच्छामरणाचा वर दिला.

आई.......मग ती आपल्या आईची सवत का असेना.आई आईच असते. हे रामायण, महाभारत शिकवतं.आम्ही अक्षय तृतीया साजरा करतो. त्या दिवसापुरते मायबाप पित्तरं आठवतो. मोठ्यांची सेवा करावी हेही आठवतो. नव्हे तर या सेवेसाठी आणि पुण्य प्राप्त व्हावं म्हणून दानही करावे म्हणून करतो. पण हा दिवस निघून जाताच आम्ही ही सेवा विसरतो आणि मन मानेल तसे वागू लागतो. हे आमचे कितपत बरोबर आहे? हीच आमची मातृपितृभक्ती असावी काय? ज्या उदरातून आम्ही जन्म घेतो. त्याच उदराला पुढे त्रास देत लोभासाठी त्यांची हत्या करतो?तसेच जे मायबाप आम्हाला हा देव हा दानव हे अंकीत शिकवितात.त्याच मायबापाची तस्वीर भींतीवर लावून त्यांची पुजा करायलाही आम्ही लाजतो. नव्हे तर मायबापाची पुजा करु नका.हे धर्म शिकवितात का?नाही........तरीही आम्ही ते करतोच. हेही कितपत बरोबर आहे. ज्या दगडाला आम्ही देव मानतो.तोच दगड साक्षात आमच्या पुढे आल्यास आम्ही त्याला ठार करतो. हे तरी कितपत बरोबर आहे?(साप सापाला देव मानण्याची प्रथा)

या वैज्ञानिक जगात या भौतिक साधनाला देव मानणे सोडा.ज्या पित्तरांसाठी हा दिवस साजरा करताय ना.खरंच सर्वांनी साजरा करा.बंधन नाही.पण.........त्याबरोबर आपल्या पितृमातृभक्तीला सदैव जागृत ठेवा. त्यांनी तुम्हाला उन्हातून सावलीत नेलंय. मृत्यूपुर्वी त्यांची सेवा या अक्षयतृतीयेनिमित्याने घडू द्या तुमच्या हातून.तेच सर्वात मोठे दान आहे. हे लक्षात घ्या. अक्षय तृतीया निमित्यानं केवळ पुजापाठच नको. कर्तृत्वही असावे हेही लक्षात असू द्या.

***




– विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com

आनंदी पहाट...


## अंतर्मनाला सक्षम व कार्यक्षम करत राहावे

**ज्योतिर्मय साहित्य**

आपण प्रत्येकाने आपल्या आध्यात्मिक गरजा समजून घेतल्या पाहिजेत. आध्यात्म हा मानसिक आणि शारीरिक उपचारांचा अविभाज्य घटक आहे. आध्यात्म संकट समयी अंतर्गत शक्तीचा स्त्रोत असल्याचे आपण जाणून घेतले पाहिजे. ते आपल्या कल्याणाच्या केंद्रस्थानी असून आपल्या जीवनातील सर्व पैलूना समृद्ध करते. शारीरिक, मानसिक, भावनिक आणि नातेसंबंध दृढ करण्यास उपयुक्त ठरते. आपल्या कौटुंबिक गरजांसाठी व्यावहारिक, समजूतदार आणि शांत दृष्टिकोनाला प्रोत्साहन देते. आपल्या अंतः प्रेरणेवर आत्मविश्वास देते आणि यशाकडे जाण्यासाठी आवश्यक ती शक्ती प्रदान करते. आध्यात्मिक तंदुरुस्ती, उद्देश निर्माण करण्यासाठी एक महत्त्वाची पायरी म्हणजे स्व-मूल्यांकन करणे होय. आपल्या जीवनाचे सात परिमाण समृद्ध करण्यासाठी वैयक्तिक योजना करण्याची गरज असते. आपले मन, शरीर, आत्मा, प्रेम, कार्य, खेळ, जग ह्याचा त्याच्याशी थेट संबंध असतो. आपण आपल्या अंतर्मनाला सक्षम करण्याची, त्याची कार्यक्षमता वाढवण्याची जरुरी असते. आपले अंतर्मनच आपला गुरु आणि मार्गदर्शक म्हणून कार्यरत होत राहते. गुरु आणि गुरुतत्व ह्याबद्दलची ओळख मूळ तत्वापासून केलीजाते.त्यात गुरु आणि गुरुतत्व यातील फरक तसेच तत्व म्हणजे काय ह्याचे महत्वही समजून घेतले पाहिजे. सध्याचे मानवी जीवन असे विस्कळीत झाले आहे, हे शास्त्रीय मीमांसेतून स्पष्ट होत असतेच, परंतू त्याच्याकडे अनकेदा दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येते. सध्याची परिस्थिती,त्या परिस्थितील सर्व सामान्य मनुष्य, त्यांच्या अडीअडचणी, त्या अडचणींच्या निवारणार्थ शोधात असलेल्यांची मानसिकता ह्या विषयांचा सविस्तर खुलासा करून घेणे अधिक आवश्यक आहे. ह्या गुरुतत्वात सकारात्मक विचार, वर्तन आणि व्यवहार करण्याची योग्य दिशा प्राप्त होत असते. ज्यायोगे सर्वत्र सकारात्मक वातावरणाची निर्मिती होत राहते.


## सेल्युलर जेलला भेट

**ज्योतिर्मय साहित्य**




अंदमान आणि निकोबार बेटांचा विचार करताच डोळ्यांपुढे उभं राहतं ते निळ्याशार समुद्राचं, उबदार वाऱ्याचं आणि हिरव्यागार निसर्गाचं सुंदर चित्र. पण या स्वर्गासारख्या बेटांमध्ये एक अशी वास्तू आहे, जी फक्त सौंदर्य नव्हे, तर इतिहासाची जिवंत आठवण म्हणून उभी आहे सेल्युलर जेल, जी पोर्ट ब्लेअरमध्ये स्थित आहे.

ही माझी पहिली अंदमान भेट होती आणि सेल्युलर जेलला भेट देणं हा त्या प्रवासाचा अविभाज्य भाग होता. याचसाठी तर केला होता अट्टाहास ! २१ फेब्रुवारीला दुपारी तीन वाजता सेल्युलर जेलला भेट देण्यासाठी आम्ही एका छोट्या बसमधून निघालो. आता आम्ही सर्व २९ जण बरोबर होतो. हॉटेलमधून बाहेर पडल्यावर वातावरण आल्हाददायक होतं. समुद्राच्या लाटा शांतपणे किनाऱ्यावर आदळत होत्या आणि वाहणारा उबदार वारा काहीतरी वेगळं अनुभवायला मिळणार याची जणू जाणीव करून देत होता.




पोर्ट ब्लेअरच्या रस्त्यांवरून आमची बस सेल्युलर जेलच्या दिशेने जसजशी पुढे जात होती, तसतशी उरी एक वेगळीच रोमांचक भावना दाटून येत होती. ज्या अंदमानबद्दल आणि सेल्युलर जेलबद्दल आपण लहानपणापासून ऐकत आणि वाचत आलो, ते ठिकाण आता प्रत्यक्ष बघायला मिळणार होतं. देशाच्या स्वातंत्र्यासाठी ज्यांनी आपल्या सर्वस्वाचा होम केला त्यांच्या वास्तव्याने पावन झालेली ही वास्तू बघण्याचा योग आता आला होता. लवकरच आम्ही सेल्युलर जेल जवळ पोहोचलो. लांबूनच एक दुमजली प्रशस्त इमारत आमचे लक्ष वेधून घेत होती. तिच्याजवळ पोहोचल्यानंतर सेल्युलर जेल हा बोर्ड आम्हाला दिसला. एक जुनी पण भव्य अशी वास्तू आमच्या नजरेसमोर होती. ती पाहिल्याबरोबर तीव्रतेने जाणीव झाली की याच पुरातन वास्तूमध्ये देशभक्ती, समर्पण यांची शिकवण देणारा इतिहास दडलेला आहे.

मुख्य प्रवेशद्वारात पाऊल ठेवताच समोर दिसलं ते एक प्रशस्त प्रांगण, ज्याच्या मधोमध उभा होता राष्ट्रीय ध्वज आणि त्याच्यासमोर एक स्मृतिस्तंभ. तिथे उभं राहताच मन अभिमानाने भरून आलं. बाजूलाच एक संग्रहालय आहे, जिथे स्वातंत्र्यसैनिकांचे फोटो, पत्रव्यवहार, वापरलेली वस्तू, आणि त्या काळातील दस्तऐवज पाहायला मिळतात. प्रत्येक वस्तू एक कथा सांगत होती. इथे गेल्यावर आम्ही सगळेच स्वतःला जणू विसरलो. वर्तमानकाळ जणू स्तब्ध झाला आणि स्वातंत्र्यवीरांचा धगधगता इतिहास जिवंत झाला.थोडं पुढे जाताच आपल्याला दिसतो तो सेल्युलर जेलचा मुख्य भाग. ह्या वास्तूची रचना अत्यंत विचारपूर्वक केली आहे. फार परिश्रम न घेता आणि फारसे मनुष्यबळ न वापरता कैद्यांवर लक्ष ठेवता यावे आणि त्यांना येथून पळून जाण्याची कोणतीही संधी मिळू नये अशा प्रकारची ही रचना आहे. त्याचबरोबर कैद्यांचे मानसिक धैर्य खच्ची व्हावे अशा प्रकारची ही रचना आहे. मध्ये शिरल्याबरोबर काही अंतरावर एक पुरातन पिंपळवृक्ष आपल्याला दिसतो हा पिंपळ वृक्ष तेथील सगळ्या घटनांचा साक्षीदार आहे असे म्हटले जाते देशभक्तांनी सोसलेल्या यातना, त्यांचा केलेला छळ या सगळ्या गोष्टींचा साक्षीदार हा पिंपळ वृक्ष आहे. आम्ही त्याला मनोमन नमस्कार केला. **(क्रमश)**



दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## स्वगुण परीक्षा


**ज्योतिर्मय साहित्य**

विषय शब्दाचा अर्थ पाहू गेल्यास''विशेषेण सिंचन्ति इंद्रियाणि मनश्च'' ज्याच्या ठिकाणी इंद्रिये व मन बुडून जातात मग्न होतात म्हणजे इंद्रीयभोग अर्थात देहातून सुख घेण्याची आवड. कधीही समाधान न होणाऱ्या आशेच्या साखळीने माणुस बांधलेला असतो. भगवंताचा विसर पडणे म्हणजे वाईट काळ समजावा. आत्मबुध्दी विसरून देहबुद्धी त जाण म्हणजे स्वर्गातुन नरकात पडण्या सारखे आहे. समर्थानी दहाव्या ओवी पासुन अठराव्या ओवी पर्यतचा प्रवास म्हणजे शरिराच्या जन्माची क्रीया ते समजून घेत असताना आपल्याला आपल्याच शरीराची किळस येते. शरीर वरवर कितीही चांगले वाटलेतरी त्यात डोकावून पहाता ते किती घाणीचे साम्राज्य आहे. हे वरील ओव्या वाचताना खात्री पटते. घाणीने भरलेले हे शरीर कितीही निर्मळ करायचा प्रयत्न केला तरी ते स्वच्छ होत नाही. समर्थीनी डोकं या अवयवाला मात्र ऊत्तमांग म्हणलं आहे. मल मुत्र ओक हे जर शरिराचे झाले नाही तर मनुष्य लवकरच मरेल. **क्रमशः**

अठ्ठावीस ओव्याच्या पुढे तर आईच्या गर्भात जीवाचे कसे हाल होतात याचे वर्मन केले आहे. आईच्या गर्भात असताना मुल सोह,सोहम् असं म्हणते मी तो आहे मी ईश्वर आहे. आणि बाहेर पडल्यावर ते ''कोहं कोहं '' म्हणू लागते.जीवाला देहबुद्धी येते. व स्वस्वरूपाची जाणीव मावळू ़ या लागते. देह विकार विकसीत होऊ लागला की सुखदुःखाचे हेलकावे बसु लागतात. यातुन सुटण्याचा ऐकचं मार्ग तो म्हणजे ''भगवंताला शरण जाणे''

सन्माननीय वाचक मंडळी तुमच्या सगळ्यांच्या प्रोत्साहननाने व समर्थाच्या आशिर्वादाने आज तिसरा दशक तुमच्या हाती देताना खुपच आनंद होत आहे गेल्या दोन महिन्यांत माझ्याच शरिराच्या काही भागाने असहकार पुकारल्यामुळे मी तुमच्या समोर व्यक्त होऊ शकले नाही. त्याबद्दल क्षमस्व

## संत कसे असतात ?



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

**ज्योतिर्मय साहित्य**

आपले शहाणपण बाजूला ठेवून जो संताला शरण जातो तोच खरा साधक. ज्याला सर्व सृष्टी रामरूप दिसते, आणि शिष्यालाही जो रामरूप पाहतो, तोच खरा गुरू. सद्गुरू कधीही मिंधेपणाने वागत नाही, आणि त्याला भीतीचा लवलेशही नसतो. आपला शिष्य कोणत्या आध्यात्मिक भूमिकेवर आहे हे संतांना कळते. देहबुद्धीचे लोक विषयाचे दास असतात, पण संत मात्र विषयावर मालकी गाजवतात. संतांजवळ जे समाधान असते ते आपल्याला लाभले, किंवा त्याची आवड उत्पन्न झाली म्हणजे संताची प्रचीती आली असे समजावे. औषध काय आहे हे न कळतासुद्धा रोग्याने ते श्रद्धेने घेतले तर त्याला गुण येतो, किंवा एखाद्याला स्वयंपाक करता आला नाही तरी त्याला अन्नाची चव समजते आणि तो पोटभर जेवू शकतो. त्याचप्रमाणे एखाद्याला ज्ञानाचा अनुभव येईल, पण शब्दाने त्याला तो सांगता येईलच असे नाही.

मीठ खारट आहे याचे जसे आपल्याला दुःख होत नाही, त्याचप्रमाणे जगामधल्या लढाया, हाणामाऱ्या, सज्जनांचा छळ, संकटे, यांचे संतांना वाईट वाटत नाही. 'वाईट वाटत नाही' याचा अर्थ ते त्यांना आवडते असा मात्र मुळीच नव्हे. पण मीठ जसे खारटच असणार, तशा जगात या घडामोडी होणारच, जगाची रहाटीच अशी आहे, हे समजून तो दुःख करणार नाही. किंबहुना, मीठ फार झाले तर खारटपणा जसा सहन होत नाही, तसे त्यालाही होईल. इतकेच नव्हे, तर त्याचा प्रयत्नही जगातले वाईट कमी करण्याकडेच असतो. विहिरीतल्या बेडकांना जशी समुद्राची कल्पना येत नाही तशी आपल्याला संतांची कल्पना येत नाही. संत हे पहिल्याने आपल्यासारखेच होते, परंतु अनुसंधानाच्या मार्गाने ते वर गेले. आपल्याला संत 'शोधण्याची' मुळीच जरुरी नाही. आपली इच्छा बलवत्तर असेल तर संतच आपला शोध करीत आपल्याकडे चालत येतील. आपली भावना कशी आहे इकडे संतांचे लक्ष असते. संत हा गुप्तपोलिसासारखा आहे; तो आपल्यामध्ये आपल्यासारखा राहतो, पण आपल्याला ओळखता येत नाही. संताला स्वतःच्या शरीरात काय चालले आहे ते सर्व दिसते; म्हणून तो रोगाची काळजी करीत नाही. संताला कर्म मागेपुढे करता येते, पण ते टाळता येत नाही; ते कुणाला तरी भोगलेच पाहिजे. संत जे साधन सांगतात ते आपल्या शक्तीप्रमाणेच असते. संत जो बोध सांगतात, त्याचे आपण थोडेतरी पालन करू या.

संत हा जसे बोलतो तसे वागतो. आपण बोलतो चांगले आणि वागतो मात्र त्याच्या उलट.




## आनंद हरवत चाललाय

**ज्योतिर्मय साहित्य**

आपण मनमोकळेपणाने, मनापासून आपल्याच कुणाचे कौतुक करतो, अभिनंदन करतो'', पाठीवर शाबासकी देतो'' आपली ही कृती प्रत्येकाला आवडत असते, समोरच्याच्या आनंदात भर घालणारी ही कृती '' जे जे कुणी करतात,

त्यांच्या विषयी मनात आपलेपणा निर्माण होतो. मित्र हो– घेणाऱ्या पेक्षा देणारा हा नेहमी श्रेष्ठ समजला जातो, ''हे लक्षात ठेवले तर, आपल्या कृतीने आनंद देणारे सभोवताली अधिक आनंदी वातावरण निर्माण करीत असतात.

यासाठी कधी पैसे खर्च नाही करावे लागत, लागते ते मोठे मन आणि चांगुलपणाची वृत्ती'' या दोन गोष्टी स्वभावात असणारी माणसे '' आनंद वाटणारी आनंदी मित्र असतात.

सामन्य माणसाच्या ईच्छा, अपेक्षा फार मोठ्या नसतात,

उलट कुणी आपणहून पुढे येत चार चांगले बोल बोलतो,

धीराच्या शब्दांनी उभारी देतो''

या आधाराने निराश मनाला नक्कीच आनंद होतो.

ईश्वराने आपल्याला आनंद देणाऱ्या इतक्या गोष्टी निर्माण करून ठेवलेल्या आहेत की, त्याचा आनंद घेण्याची दृष्टी,

आणि वृत्ती आजची माणसे हरवून बसली आहेत,

कारण ''स्वत:तच गुंगलेला माणूस दुसरे काही पाहू शकत नाही.

मानव निर्मित प्रश्न, माणूस करीत असलेल्या घोडचूका

आणि हे करून ही न येणारे शहाणपण '' यामुळे वाट्याला येते ते केवळ दुःख, आनंद कोसो दूर रहातो.

माणसे विचित्र असतात ,कोत्या मनाची असतात, अशा माणसांना दुसऱ्याचे भले झालेले पाहवत नसते, कुणाला आनंद झाला की यांना अपार दुःख होते, आणि ही माणसे

आनंदावर विरजण घालून आनंदी माणसाचा हिरमोड करतात.

अशी वृत्ती लहान मुलांच्या वागण्यातून दिसते, मोठी माणसे चतुराईने वागत असतात, सफाईने हसत हसत ते एखाद्याचा आनंद हिरावून घेतात.

कुत्सितपणे बोलून ते समोरच्या आनंदित झालेल्या माणसाचा पाणउतारा करतात, जणू त्याने मिळवलेला आनंद चमचेगिरी करून मिळवलाय, कुणाला फसवून मिळवलाय असं हे कुत्सित लोक सूचित करीत असतात.

हसरा चेहरा खर्रकन उतरला ''म्हणजे या विघ्नसंतोषी लोकांना आनंद मिळत असतो.

म्हणजे बघा

स्वतः आनंदित रहायचे नाही, आणि कुणाला आनंद मिळूच द्यायचा नाही '',

अशा लोकांपासून दूर राहिलेले बरे, निदान हरवत चालला आनंद आपल्या हातून निसटून जाणार नाही.

***



## नीतिशतक निरूपण

अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

**ज्योतिर्मय साहित्य**

**विपदि धैर्यमथाभ्युदये क्षमा**
**सदसि वाक्पटुता युधि विक्रमः ।**
**यशसि चाभिरुचिर्व्यसनं श्रुतौ**
**प्रकृतिसिद्धमिदं हि महात्मनाम् ।।**

अर्थ – संकटात धैर्य, उत्कर्षात क्षमा, सभेत वाक्पटुत्व, युद्धात पराक्रम, यशाच्या बाबतीत अभिरुची, अध्ययनात आसक्ती, हे महान लोकांचे विशेष गुण प्रकृतिसिद्ध आहेत. या गुणांच्या प्राप्तीसाठी ते विशेष प्रयास करीत नाहीत. हे गुणविशेष नैसर्गिकतःच त्यांच्या स्वभावात असतात.

या श्लोकात कवीश्रेष्ठ भर्तृहरींनी महान लोकांच्या गुणांविषयी सांगीतले आहे. धैर्य, क्षमा, वाक्पटुत्व, पराक्रम, यशाभिरुची आणि अध्ययनासक्ती हे गुण महान लोकांचे ठायी उपजत असतात, असे प्रतिपादन भर्तृहरींनी केले आहे.




**ज्योतिर्मय साहित्य**

भारती नावाचे एक संस्कृत कवी होते, त्यांनी किरात अर्जुन हे नाटक लिहिले. त्यात ते म्हणतात केवळ मनात आले की केले असे करू नये.विचार अंती करावे. उदा.एखादा हत्ती गरिबाने अचानक विकत घेणे. तो त्याचे पोटही भरु शकणार नाही. अविवेकाने माणसाचे पदरात दुःखच पडते. वाईट बाजूस काढून उत्तमाचा स्वीकार म्हणजे विवेक.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

राम विचार करतात की सीतेस डोहाळे लागलेत व दुसऱ्या बाजूस लोक भावना जिंकायची आहे.डोहाळे पुरवायचे हे दिसू द्यायचे नाही.म्हणून मनात सीते विषयी पूर्ण खात्री असूनही तिचा त्याग केला.दुसरे दिवशी प्रातःकाळी सीतेस वनात घेऊन जा आणि तिथेच सोडून तू परत ये असा आदेश लक्ष्मण यास प्रभू श्रीरामांनी दिला. लक्ष्मण केवळ आज्ञापालन म्हणून सीतेस वनात घेऊन प्रातःकाळी निघाला.

सीतेला ही डोहाळे पुरविणे आहे हे माहीत होते. लक्ष्मणाला हा सीतेचा त्याग वाटला. रस्त्याने जाताना सीता रामाचे गुण वर्णन करू लागली. लक्ष्मण पडलेल्या चेहऱ्याने ऐकू लागला. तेंव्हा ती म्हणे तू नाराज का?तेंव्हा लक्ष्मण म्हणे रामानी तुझा त्याग केला आहे. हे ऐकून तिच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला. सुखाचे दुःख व्हायला वेळ लागत नाही.त्या रामावर रागावल्या. माझी शुद्धता अग्नी परीक्षे नंतर ही रामास पुरे वाटली नाही काय? असे ती म्हणुन लागली.

**क्रमश**




## पिंपळाचे आयुर्वेदिक उपाय

**ज्योतिर्मय साहित्य**

पोटदुखी पिंपळाच्या २–५ पानांची पेस्ट बनवून त्यात ५० ग्रॅम गुळ घालून मिश्रण बनवा आणि या मिश्रणाच्या लहान लहान गोळ्या बनवून दिवसातून ३–४ वेळा खा. पोटदुखीवर आराम मिळेल.

अस्थमा

पिंपळाच्या झाडाची साल आणि पिकलेल्या फळांची वेगवेगळी पावडर बनवून ती सम प्रमाणात एकत्र करा. आणि हे मिश्रण दिवसातून ३–४ वेळा खा. अस्थमा दूर होण्यास नक्कीच मदत होईल.

साप चावल्यावर

विषारी साप चावल्यावर पिंपळाच्या कोवळ्या पानांचा रस दोन थेंब घ्या आणि त्याची पाने चावून खा. त्यामुळे विषाचा परिणाम कमी होण्यास मदत होईल.

त्वचारोग

पिंपळाची कोवळी पाने खाणे त्वचेच्या रोगांवर उपचारात्मक ठरते. पावलांना भेगा पडणे पिंपळाच्या पानांचा रस भेगा पडलेल्या पावलांवर लावणे, लाभदायी ठरते.



रक्ताची शुद्धता

१–२ ग्रॅम पिंपळ बीज पावडरमध्ये मध मिसळून रोज दोन वेळा घेतल्याने रक्त शुद्ध होते.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

बद्धकोष्ठता

पिंपळाची ५–१० फळे रोज खाल्याने बद्धकोष्ठतेच्या समस्येवर आराम मिळतो.


डोळ्यांचे दुखणे


पिंपळाची पाने दुधात बुडवून डोळ्यांवर ठेवल्याने डोळ्यांचे दुखणे कमी होते.

दातांचे दुखणे

पिंपळ आणि वडाच्या झाडाची साल घेऊन त्याचे एकत्र मिश्रण बनवा. हे मिश्रण गरम पाण्यात उकळवून त्याने गुळण्या केल्यास दातदुखी दूर पळेल.

# रवींद्रनाथ टागोर





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२


## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

ज्योतिर्मय साहित्य

मी या ठिकाणी फक्त तीनच कथांचा उल्लेख केला आहे. सर्व कथांबद्दल लिहिणे शक्यही नाही. रवींद्रनाथांचे व्यक्तिमत्व आणि साहित्य यांची व्याप्ती अमर्याद आहे. जो जो आपण वाचत जातो, तो तो आपल्याला कळते की आपल्याला फक्त हिमनगाच्या वर दिसणाऱ्या भागाएवढेच कळले आहे. खूप मोठा भाग अज्ञात राहिला आहे.

त्यांच्या जीवित आणि मृत, समाप्ती, शिक्षा, ऊन-सावली, क्षुधित पाषाण, अतिक्रमण, पहिला नंबर, वर-वधू या सारख्या कथांतून अशा स्त्रीपात्रांचे दर्शन आपल्याला घडते. वाचकांनी त्या मुळातूनच वाचाव्या अशा आहेत. रवींद्रनाथांच्या २१ कथांचे भाषांतर मामा वरेरकर यांनी एकविंशति या नावाने केले आहे. मृणालिनी गडकरी यांनीही त्यांच्या काही कथा पोस्टमास्तर आणि इतर कथा या नावाने अनुवादित केल्या आहेत.

रवींद्रनाथांच्या कथांचा आढावा आपण घेत आहोत. मागील २१ आणि २२ या भागात आपण त्यांच्या काही लघुकथा पाहिल्या. आजच्या या भागात त्यांची एक दीर्घकथा किंवा जिला लघु कादंबरी असेही म्हणता येईल, अशा नष्टनीड कथेबद्दल जाणून घेण्याचा प्रयत्न करू या. नष्टनीड ही टागोरांची अतिशय लोकप्रिय कथा आहे. या कादंबरीवर सत्यजित रे यांनी चारुलता या नावाचा सुंदर चित्रपट काढला आहे. १९६४ मध्ये हा चित्रपट आला. या चित्रपटामध्ये तत्कालीन बंगालमधील वातावरण बघायला मिळते. अनेक कलात्मक चित्रपटांची निर्मिती करणाऱ्या सत्यजित रे यांचा हा स्वतःचा अतिशय आवडता असा चित्रपट. या चित्रपटाचे कथानक थोडक्यात असे आहे. भूपती हा एक लिहिण्याची आवड असलेला पत्रकार आहे. पण साहित्यविषयक लेखन त्याला आवडत नाही राजकीय घटनांमध्ये त्याला रस आहे.




# मान्सूनचा सुखद सांगावा

ज्योतिर्मय साहित्य

मागील काही वर्षात दुष्काळाने पिचलेल्या महाराष्ट्राला भारतीय हवामान खात्याने सुखद धक्का दिला आहे. भारतीय हवामान खात्याने यावर्षी पडणाऱ्या पावसाचा अंदाज वर्तवला आहे. हा अंदाज बळीराजासाठी सुखावणारा आहे. कारण यावर्षी सरासरीपेक्षा अधिक ( १०५ ) टक्के इतका पाऊस पडेल असा अंदाज भारतीय हवामान खात्याने वर्तवला आहे. या अंदाजात पाच टक्के कमी अधिक तफावतीची शक्यता गृहीत धरण्यात आली आहे याचाच अर्थ यावर्षी १०० ते ११० टक्के पावसाची शक्यता आहे. देशाच्या उत्तर आणि ईशान्य भागात तसेच महाराष्ट्रासह दक्षिण भागातही सरासरी इतका किंवा सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडेल असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. यावर्षी संपूर्ण महाराष्ट्रावर वरुण राजाची कृपा राहणार असून कायम दुष्काळग्रस्त असणाऱ्या मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातही पावसाचे प्रमाण अधिक असण्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. हवामान खात्याच्या या अंदाजाने राज्यातील बळीराजा सुखावला आहे. हा अंदाज बळीराजासाठी जितका सुखावणारा आहे तितकाच तो उद्योग जगतासाठीही सुखावणारा आहे. कारण कोरोनामुळे



उद्योग जगताची घसरलेली गाडी अजूनही सावरलेली नाही. त्यात मागील दोन वर्ष राज्यावर दुष्काळाचे सावट होते. मराठवाडा आणि विदर्भात दुष्काळसदृश परिस्थिती होती त्याचा उद्योग जगतावर देखील मोठा परिणाम झाला आहे. भारत हा कृषिप्रधान देश आहे. भारताची अर्थव्यवस्था प्रामुख्याने शेतीवरच अवलंबून आहे. शेती हाच भारताच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. आजही देशाची ६० टक्के लोकसंख्या ही शेतीवरच अवलंबून आहे. त्यामुळे तिच्या स्थैर्यासाठी आणि विकासासाठी शेतीचे विशेष महत्व आहे. मागील काही वर्ष देशात दुष्काळ पडला होता. त्याचा परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर झाला होता. कोरोनामुळे देशातील अनेक उद्योग ठप्प पडले होते त्यामुळे देशाचा जिडीपी ही घसरला होता अशावेळी शेती क्षेत्राने देशाला वाचवले होते. कोरोना गेल्यानंतर सर्व काही सुरळीत होईल अशी अपेक्षा असतानाच मागील दोन वर्ष देशात आणि राज्यातील काही भागात भीषण दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली होती. या वर्षी राज्यात समाधानकारक पाऊस पडला असला तरी राज्यातील काही भागात दुष्काळसदृशच परिस्थिती होती. दुष्काळसदृश परिस्थितीमुळे राज्यात भीषण पाणी टंचाई निर्माण झाली आहे. राज्यातील पाणी साठा संपत आला आहे. नद्या कोरड्या पडल्या आहेत. धरणे आटली आहे. बोअरवेलला पाणी लागत नाही. नागरिकांना वापरण्यासाठी सोडा पण पिण्यासाठी देखील पाणी मिळत नाही. एका एका हंड्यासाठी नागरिकांना कैक किलोमिटरची पायपीट करावी लागत आहे. शहरातही काही भागात टँकर चालू आहे. राज्यातील काही भागात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याने शेतीलाही पाणी मिळणे मुश्कील झाले आहे. अशावेळी सर्वांच्या नजरा हवामान खात्याच्या अंदाजाकडे लागल्या होत्या. सुदैवाने हवामान खात्याचा सुखद अंदाज आल्याने राज्यातील दुष्काळग्रस्त नागरिकांना सुखद धक्का बसला आहे. यावर्षी सरासरीपेक्षा अधिक पाऊस होणार असल्याने भरघोस पीक येऊन रान आबादानी होणार आहे. शिवाय राज्यातील नागरिकांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही मिटणार आहे. जर हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार पाऊस झाला तर उद्योग जगतावर ही त्याचा सकारात्मक परिणाम होईल. एकूणच हवामान खात्याने वर्तवलेला मान्सूनचा हा सुखद अंदाज सर्वांनाच सुखावणारा आहे.



श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# नूतन विद्यालयाच्या सान्वी, तन्मय यांचे घवघवीत यश

ज्योतिर्मय साहित्य

**सेलू** – बृहन्मुंबई विज्ञान अध्यापक मंडळाच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा २०२४-२५ मध्ये सेलू येथील नूतन विद्यालयाच्या दोन विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. या स्पर्धेत इयत्ता सहावीतील सान्वी गजानन शितळे हीने सुर्वण पदक, तर तन्मय जयकिशन भुतडा याने रौप्यपदक मिळवले आहे. या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

बृहन्मुंबई विज्ञान अध्यापक मंडळाच्या वतीने आयोजित या राज्यस्तरीय स्पर्धेत विज्ञान विषयातील गोडी निर्माण करणे व वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे हा उद्देश असतो. इयत्ता सहावी व नववी या दोन स्तरांवर दरवर्षी होणाऱ्या या स्पर्धेत यंदा राज्यभरातून हजारो विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धेच्या लेखी चाचणी, प्रयोगात्मक चाचणी, प्रकल्प सादरीकरण व





मुलाखत या तीनही टप्प्यांत सान्वी व तन्मय या दोघांनीही उल्लेखनीय कामगिरी केली. अंतिम फेरीत सान्वीने आपले वैज्ञानिक कौशल्य प्रभावीपणे सादर करत सुर्वण पदक मिळवले, तर तन्मय भुतडा याने उत्तम कामगिरी करत रौप्यपदक आपल्या नावे केले. या यशामागे परिश्रम, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे पाठबळ हे तितकेच महत्त्वाचे ठरले आहे. शाळेच्या वतीने तसेच विविध स्तरातून सान्वी आणि तन्मय यांचे अभिनंदन होत आहे.

# श्रीयश फार्मसी मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

ज्योतिर्मय साहित्य

**छत्रपती संभाजीनगर** – श्रीयश प्रतिष्ठानच्या श्रीयश इन्स्टिट्युट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च मध्ये दिनांक १४ एप्रिल २०२५ येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर याची १३४ सावी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून करण्यात आली. यावेळी सर्व उपस्थितांनी महामानव डॉ. बाबासाहेब आबेडकर यांना अभिवादन केले. तसेच राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थानी या कार्यक्रमात उत्फुर्त सहभाग घेतला.

या प्रसंगी श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. इंजि. बसवराज मंगरूळे, मुख्य कार्यकारी अधिकारी व संस्थचे सर्व पदाधिकारी, श्रीयश फार्मसीचे प्राचार्य, विद्यार्थी, एन. एस. एस समन्वयक उपस्थित होते




# शिक्षकांसाठी प्रेरणा प्रबोधन देणारा ‘‘गारांचा पाऊस‘‘

ज्योतिर्मय साहित्य

अवघड जागेचे दुखणं आपण आपल्या मनाशी तयारी करायला हवी की आपली मुलं वयात येताना आपण त्यांना काय आणि कसं सांगणार आहोत? चांगल्या पुस्तकातून त्यांच्या कुतुहलाने निर्माण झालेल्या गोष्टीचे ज्ञान आपण देऊ शकतो. कशासाठी आपण पालक फार लहरीपणा करतो बऱ्याच वेळा एखाद्या प्रसंगी आपली फजिती झाली मुलानी लाज काढली की आपण खडबडून जागे होतो. घरात एकमेकांनी एकमेकांना मदत करणे गरजेचे आहे. मागण आणि देणं ही प्रेमाची देवाणघेवाण आहे. आपण जे विचार करतो ते मुलांशी मोकळे पने बोललो तरी प्रश्न सुटतील .

बदक ससा चिमणी या लेखात लेखिका पटवून सांगतात की ज्यांच्या अंगी जे कौशल्य आहेत ती जन्मतः आहेत ती ओळखून आपण घडायला आणि घडवायला हवं. प्रत्येक मूल काही न काही खूप चांगलं करत असत.आपल्याकडे तसा डोळसपणा आणि दृष्टिकोन हवा त्याच्यातील कला गुणांना ओळखण्याचा.

दातांची परी ही पण एक छान कथेतून अमेरिकन ठेचेतून शहाणपण शिकून जागरूकपणे आपल्यातलं चांगुलपण जपायला हवं. भारतातील माणसं दात फेकून देतात पण मूल्य फेकून देत नाहीत. ती रुजवतात कायमस्वरूपी.

लादलेली व्यंग. पालकांचा मुलांशी हिंसक वागणे हे गुन्हा वाटायला हवं. बऱ्याचशा लाटा थोपविण्यातक मनोबल मुलांत निर्माण करणं पालकांना शक्य असत. आपल्या आयुष्यातील कर्तबगारीच्या मुकुटतला आणखी एक तुरा म्हणून मुलांकडे पाहिलं जात त्यांचा विकास त्याचं व्यक्तिमत्व जोपासन एक चांगला माणूस निर्माण करणं ही कर्तव्य विसरली जातात. कित्येकदा मुलामुलींचे अनेक प्रश्न पालकांच्या लक्षातही येत नाहीत. मुलांमध्ये शारीरिक, मानसिक, भावनिक कणखरपणा नसणे ताकदीने आनंदाने वागता न येणे हे अपंगत्वच आहे. व्यंग नैसर्गिक असतात अपघाती असतात ही कल्पना खोटी आहे नाही का? व्यंग कित्येकदा आपण निर्माण करतो. कधी आपल्या रागाने कधी प्रेमाने सुद्धा. थोड अंतर्मुख होऊन विचार करूया आपण अशी व्यंग निर्माण करतो आहोत का?



पुस्तक परीक्षण


सौ. जयश्री अर्जुन मुंडे
अंबाजोगाई

पालकपणाचा राजीनामा आपल्या मुलांना कायम लहान म्हणून वागवलं प्रौढपणे त्यांच्याशी बरोबरीच्या नात्यानं बोलणं वागणं काही बाबतीत त्याच्या मताला मान देणं त्यांचा आत्मविश्वास वाढवणं आत्मप्रतिष्टा जपन हे केलं नाही तर मुल वाढत नाही. ते मोठ्या वयातही लहान असल्यासारखं वागत. पालकांनी सतत पालक म्हणून पालक म्हणून वागणं सोडून द्यायला हवं. त्यांनी प्रौढ व्हायला हवं, पालकपणाचा राजीनामा द्यायला हवा.

वाढ स्वतःची खरच पालकत्वाची कौशल्य शिकून पालक होता येत का? माणूस जेव्हढा परिपूर्ण स्वतः वाढेल तेवढा तो चांगला पालक होत जाणार.

स्पायडरमन सामाजिक जबाबदारी सर्वांनाच कळायला हवी. त्यासाठी तळमळीने धडपडून एकजुटीने पेटून उठता यायला हवं.

संस्कार. स्वतः च्या बोलण्याच्या पद्धती सवयी बदलणं ही सहज सोपी गोष्ट नाही पण निदान आपण जे बोलतो आहोत त्याचा काही वेगळा परिणाम मुलांच्या मनावर होतो आहे ह्या दुसऱ्या बाजूची जाण मनात जागी असली की बोलल्यानंतर तरी जाणवेल की आपण बोलून न बोलून खर बोलून चुकीच बोलून काय साधलं आणि काय साधता आलं असत. निदान बोलण्याचा वेग कमी करण मुलांना बोलायला जास्त वेळ देणं आपण जास्त मनः पूर्वक ऐकणे हे लगेच करता येईल.




दोन पूर्ण माणसं. स्त्री पुरुषांमधील दरी रुंदावत गेली. बाईमध्ये थोडा पुरुषपणा हवा. तिच्यात धडाडी, खंबीरपणा दुसऱ्याला आधार देण्याची कुवत निर्णयक्षमता हवीच. पुरुषात थोडा बाईपण हवं तर ते चांगले माणूस होतात आणि पालकही. दोन पूर्ण माणसं मुलांना पालक म्हणून का मिळू नयेत?

मूल आणि श्रम मज्जातंतू तयार होणे हे माणूस शहाणा होण्याच्या दृष्टीने गरजेचं आहे. श्रम माणसाला काटक चिवट बनवतात. श्रम शरीर तयार करतात. पण मनालाही धीर धरायला शिकवतात, बळ देतात, कल्पकतेला आवाहन करतात, शांतपणा शिकवतात, दुसऱ्याच्या श्रमाची प्रतिष्ठा करण्यास शिकवतात. श्रम मुलांच्या दिनचर्ये चा भाग बनला पाहिजे.

पालक मंडळ. एकेक पालक मंडळ बनण्याची गरज आहे. कधी मुलांच्या वागण्याबद्दलचे गंभीर प्रश्न कधी पालकांच्या स्वतःच्या काळज्या कधी काही माहितीची गरज कधी यश सांगण्यासाठी जागा हवी असते. एकमेकांपासून खूप शिकायला मिळत अनेक वाटा मिळतात अनेक प्रश्न सुटतात. म्हणून पालक मंडळ काळाची निकड.

कणभर पुढे कुठलाही ज्ञान चार तज्ञ लोकांची मक्तेदारी होऊ नये. ते सहजपणे सर्वांपर्यंत पोहचण्यात काम अशी सदर करतात. वाचताना वाचक शिकतो. तस लिहिताना लेखकही खूप काही शिकतो. त्याला नव्या नव्या वाटा दिसू लागतात. मुलांना समजून घेण्याच्या त्यांच्याकडून शिकण्याच्या आणि त्यांना शिकू देण्याच्या वाटा सर्वांना गवसत राहोत हीच अपेक्षा!

गारांचा पाऊस ही सदर श्रीभाऊ माजगावकर म्हणाले होते की मूल आणि पालक, मुल आणि शाळा, मूल आणि समाज यांच्यात जे जे घडत त्याविषयी लिहा एकच प्रकारच बंधन घालून घेऊ नका.

अतिशय सुंदर दिशादर्शक डोळ्यातील झणझणीत अंजन घालणारे पुस्तक सर्वांनी आवर्जून वाचा.

# आनंदाचं झाड शाळेतलं,शाळेतच वाळवी लागलेल

**ज्योतिर्मय साहित्य**

होय हे अगदी विरोधाभास असला तरी हे खर आहे. एखाद आनंदाचं झाड हे वाळवी लागलेलं असतं. हे झाड जेव्हा पाखरांनी गजबजलेलं असतं. तेव्हा त्या पाखरांच्या मधुर स्वरांनी हे अतिशय समृध्द होत आणि त्यावर पोपटाच्या ढोल्या, घुबडाच्या ढोल्या, असे पक्षी वास्तव्यात असतात.

असेच जुने लिंबाचे झाड होते. त्यावर घुबडाला, पोपटाला राहायला आनंद वाटायचा. दररोज परिपाठ सुरू झाला की घुबड त्याच्या ढोलीतून बाहेर यायचं आणि फांदीवर बसून रोज परिपाठ ऐकायचं. ते झाड होतं तोपर्यंत हे नित्याच होतं. मलाही त्या घुबडाला पाहिल्याशिवाय करमत नव्हतं. असेच एकदा वाळवी लागून त्या झाडाच्या किडीचे प्रमाण वाढले आणि हे घुबडाला आनंद देणारे झाड ऑफिसवर पडेल या भीतीने तोडण्यात आले. ते घुबड दूर कुठेतरी निघून गेले. नंतर मला चुकल्या चुकल्या प्रमाणे होत होते . कारण ती घुबड जोडी मला नंतर पाहायला मिळाली नाही.

आता काही दिवसापूर्वी शाळेतल्या दुसऱ्या लिंबाच्या झाडाला कीड लागलेली आहे ते आतून वाळवी ने पूर्ण पोखरले आहे. याच्या अनेक फांद्या तोडण्यात आलेल्या आहेत. त्यातच माझी आवडती पोपटाच्या ढोलीची फांदिही गेली. मला पोपटाच्या ढोली बद्दल खूप वाईट वाटले. कारण त्याचे मिठू मिठू मी रोज ऐकत होते. मुलांच्या परिपाठबरोबर पोपटांचा झाडावर नियमित परिपाठ सुरू आहेच. या परिपाठ ऐकण्याची सवय झालेली आहेच. पण असे दृश्य दुर्मिळ होतेच. किती सुरेख या पोपटाचा परिवार या झाडावर अनेक वर्षापासून वास्तव करीत आहे. त्या झाडाचा, या शाळेचा, या शाळेतील झाडाचा या पाखरांना किती गोड लळा लागलेला आहे. त्यांची घर असणारी ढोलीची फांदी जरी झाडापासून तोडली तरी ही पाखरे रोज परिपाठ समयी या निष्पर्ण, वाळवी लागलेल्या वृक्षावर येतात. आणि त्याचे मंजुळ बोल नित्य कानावर पडतातच. या वरून हे लक्षात आले की वृक्ष जेव्हा बहारदार होता तेव्हा देखील हे पक्षी जसे आनंदाने या वृक्षावर बागडत होते तसेच हे पक्षी आता हे झाड त्यांचं आनंदाचं झाड खूप खूप वाळवी लागून निष्पर्ण झालेलं आहे तरीही त्या पक्षांचे त्या झाडावरील प्रेम यत्किंचितही कमी झालेले नाही. ही पाखरे दररोज वृक्षाला या शाळेला भेट देण्यास निश्चित कुठेही गेली तरी परिपाठ समयी येतात. आपला परिपाठ ह्या पक्ष्यांच्या मनावर देखील राज्य करतो. हे पक्षी शालेय प्रांगणातील झाडावर किती छान रुळलेत हे कळले. आणि दररोज त्यांना पाहण्याची त्यांचा मधुर परिपाठ ऐकण्याची सवय आम्हालाही लागली. या आनंदाचं झाडावर या पोपटी पाखरांची शाळा रोज भरते. या शाळेतील विद्यार्थी ,शिक्षक सर्वांना या झाडावरील पोपटाचा लळा लागला आहे हे विशेष. नित्य पोपटाला पाहणारे अनेक पक्षीप्रेमी या आनंदाच्या झाडाने पहिले आहेत. या पोपटाला लागलेला आनंदाचं झाडाचा लळा किती अविस्मरणीय आहे. हे पक्षी दिवसभर इकडे तिकडे उडतात.




भटकतात. पण सकाळी आणि संध्याकाळी दररोज या झाडावर ते विसावतात. या झाडाचा रहिवास, सहवास त्यांच्या संवेदनशील मनावर कायमचा रुजला आहे. त्यांना या झाडाची त्याला वाळवी लागलेली असली तरीही झालेली सवय, लागलेला लळा हे शिकवून जातो की एकदा लळा लागला की लागलाच मग अवस्था कोणतीही, कधीही झाली तरी तो शेवटपर्यंत टिकतो. या पक्षांनी किती सुंदर सुरेख धडा आज शिकवला. अनेक उन्हाळे, पावसाळे, हिवाळे या पाखरांनी त्यांच्या आनंद देणाऱ्या झाडासोबत अनुभवले असणार आहेत ते अविस्मरणीय आणि सुरेख आहेत. अनेक झाड या वाळवी लागलेल्या झाडापेक्षा नक्कीच सुंदर टवटवीत हिरवेगार आहेत. तरीही त्या सौंदर्यापुढे त्यांना त्यांचा लळा वाटू लागला आहे.



**सौ. जयश्री अर्जुन मुंडे**
**अंबाजोगाई**

पाखरांचे आनंदाचं झाड हे पूर्वी अतिशय बहारदार होते. पण त्यावर आतून अनेक वाळवी ह्या हेतुपूर्वक अनेक कट कारस्थान करून केलेल्या कृतीतून त्यांनी झाडाला वाळवी लागण्यास मजबूर केलं. अनेक वेळा असे वाळवी लागून बदलण्यास वाळण्यास प्रेरित करणारे घटक हे आपल्या आजूबाजूला वावरत असतात ते कधीही दुष्ट कपटी मनाने हल्ला करतात. तो हल्ला आतून कायमचे पोखरून टाकण्यासाठी, आपले अस्तित्व पूर्णतः नष्ट करण्यासाठी केलेला असतो. आपण वाळू लागलो की त्यांच्या कृती सफल झाल्या असे समजावे. वाळवी जरी झाडाला वाळवून टाकत असली तरी त्याने त्याच्या आयुष्यात केलेलं सत्कार्य कधीच नष्ट होऊ शकत नाही. आणि या सत्कर्याची दखल पोपटाला आहे. अनेक संकट या त्यांच्या आनंदाच्या झाडाने स्वतःच्या अंगावर झेलून त्यांचे प्राणपणाने रक्षण केलेलं आहे. पाखरांची झाडा बद्दल असणारी निष्ठा ही महत्त्वाची त्याच्या निःस्वार्थ, निर्मळ, निरहेतुक, परोपकारी कार्याची दखल होय. झाडाकडे असणारे सद्गुण पाखरांनी हेरले आहेत आणि स्वतःच्या अंगी रुजली आहेत.

ते झाडं आता कधीही उन्मळून पडणार आहे कारण ते वाळविणे ते पोखरले आहे. तरी पाखरांना हे झाड कायम स्मरणात राहणार आहे कारण की पाखरांचा आणि झाडाचा सहवास हा जिव्हाळा युक्त होता.

आज ही पोपट आयुष्याचे अनेक मौल्यवान धडे शिकवून गेले आहेत. ज्यांनी आपल्याला आसरा, आधार दिला, आपलं अस्तित्व स्वीकारलं, फुलवल आंजारल, गोंजारल, संकटात रक्षण केलं त्यांना कधीही विसरायचे नाही.असे परोपकारी कार्य करणारे दुर्मिळ व्यक्तिमत्त्व हे आयुष्यभर चिरस्मरणात राहणार आहेत. वाळवी प्रमाणे पोखरून टाकणारे मानव देखील आपल्या अवतीभोवती अस्तित्वात आहेत. ते घटक निष्पाप, निर्मळ, असलेल्या व्यक्तीला त्याच्या अस्तित्वाला आतून पोखरण्याचे कट रचतात वेळीच त्यांना ओळखून त्यांच्यापासून चार हात लांब राहणे कधीही चांगले. दोष नसताना देखील ते त्यांच्या कपटी पोखरण्याच्या गुणामुळे कायम सात्विक लोकांना पोखरण्याचे कार्य करतात. कधी कधी आपण त्यांच्या आधे मध्ये कशात नसतो पण तरीही त्यांच्या कोत्या मनातील बुरसटलेल्या विचारांमुळे ते अनेक गोष्टीत आपल्याला गुंतवू शकतात. बदनाम करू शकतात. पण मुळात वाळवी दुष्ट असल्यामुळे तिला अस्तित्व मुळातच नाही. तिच्यात कोणताच गुण नसल्यामुळे तिला कोणी लक्षात ठेवणार नाही हेही तितकंच ठाम आहे. पाखरांनी निष्ठा, कृतज्ञता, परोपकार वृत्ती, जाणिवांच्या ज्योती मनात उजळवल्या आहेत.

आज अनेक गोष्टी त्यातील मर्म मला पाखरांनी शिकवला.

वाळवी लागलेलं झाड पाखरांच्या मनात कोरलं गेलेलं आहे. धन्यवाद या झाडाचे आणि त्या पाखरांचे त्यांच्या मूळ मला आयुष्याचे सर्वात महत्वाचे हेतू समजले.

लिंबाच्या झाडावरती
भरे पोपटांची शाळा
बालकांना लागला
पोपटाचाच की लळा
पाखरांचा किलबिलाट
होई झाडांच्या वरती
बालकांची कुजबुज
अंगणातच घडती
आनंदाचं झाड
शाळेतलं किडलेल
आनंदाचं झाड
शाळेतच पोखरलेल
शाळेतच जिरलेल
शाळेतच विरलेल
वाळवी लागलेलं
जीर्ण जीर्ण झालेलं
इतरांसाठी झिजलेल
आयुष्यातून उठवलेलं
उध्वस्त झालेलं
वाळविणे खाल्लेलं
एक झाड असेही
अबोल शांत मिटलेल
कायमच मनात
कटाने विटलेल
सत्कर्माच्या पाऊलखुणा
तशाच हताश उमटवलेल
तसच हसत दबा धरलेलं
आतून पूर्ण पोखरलेल
पाखरांच्या मनातलं
पाहून त्यांना लाजलेल
वाळविणे ते पोखरलेल
उन्मळून पडलेलं
आरोपांनी कोसलेल
बदनामी ने थिजलेल
विनाकारण छळलेल
पापणीत उतरलेलं

# मुंबईत २१ ते २४ एप्रिलदरम्यान आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मराठी चित्रपट महोत्सवात ४१ चित्रपटांची मेजवानी

## पु. ल. देशपांडे कला अकादमीत महोत्सव

**ज्योतिर्मय साहित्य**

**मुंबई** – मुंबईच्या पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी येथे येत्या २१ ते २४ एप्रिलदरम्यान आंतरराष्ट्रीय दर्जाचा 'मराठी चित्रपट महोत्सव-२०२५' आयोजित करण्यात आला असून या महोत्सवात दाखवण्यात येणाऱ्या ४१ चित्रपटांची घोषणा सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड आशिष शेलार यांनी केली.

सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ आणि पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी यांच्या सयुक्त विद्यमाने हा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे.

या महोत्सवाचे उद्घाटन २१ एप्रिलला सायंकाळी सहा वाजता होणार आहे. उद्घाटन सोहळ्यानंतर रात्री आठ वाजता रोहन मापुस्कर दिग्दर्शित 'एप्रिल-मे ९९' हा चित्रपट ओपनिंग फिल्म म्हणून दाखविण्यात येणार आहे तर २४ एप्रिल रोजी दिग्पाल लांजेकर दिग्दर्शित 'संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई' हा चित्रपट क्लोजिंग फिल्म म्हणून दाखवण्यात येणार असल्याचे मंत्री.ॲड शेलार यांनी सांगितले.

पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या रविंद्र नाट्य मंदिर, मिनी थिएटर आणि प्रायोगिक रंगमंच येथे हे सर्व चित्रपट दाखवण्यात येणार आहेत. यामध्ये २२ एप्रिल रोजी अनुक्रमे सकाळी दहा वाजता पळशीची', 'बटरफ्लाय' आणि 'येरे येरे पावसा' हे चित्रपट दाखवण्यात येणार असून दुपारी एक वाजता 'बाईपण भारी देवा', 'विषय हार्ड' आणि तिच शहर होणं हे चित्रपट दाखवले जातील.

दुपारी तीन वाजता मराठी भाषेवर आधारित 'इंटरनॅशनल फालमफोक', 'ग्लोबल आडगाव' आणि 'या गोष्टीला नावचं नाही', हे चित्रपट दाखवले जातील. सायंकाळी सहा वाजता 'गोदाकाठ',पाणी, आणि 'झॉलिवूड' तर रात्री आठ वाजता 'भेरा', विनोदी चित्रपट 'चोरीचा मामला' आणि 'पॉडीचेरी हे चित्रपट दाखविण्यात येणार असल्याचे मंत्री ॲड शेलार यांनी सांगितले.

२३ एप्रिल रोजी सकाळी दहा वाजता 'बार्डे', 'छबीला' आणि शेतकरी आत्महत्येवरील 'तेरव' हा चित्रपट दाखविण्यात येणार आहे. दुपारी एक वाजता 'पोटरा', 'गिरकी' आणि स्वातंत्र्य संग्रामावरील 'शहिद भाई कोतवाल' हे चित्रपट दाखवले जाणार आहे. दुपारी तीन वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक समतेवर आधारित 'जयंती', 'गाभ' आणि 'फनरल' तर सायंकाळी ६ वाजता 'स्थळ', 'अमलताश' आणि 'कुलुप' हे चित्रपट दाखवले जाणार आहे. त्याचबरोबर रात्री आठ वाजता 'मी वसंतराव' हा बायोपिक, 'बापल्योक' आणि ' गोदावरी ' हे चित्रपट दाखवले जातील.

२४ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता 'स्वीट ॲण्ड शॉर्ट', 'रौंदळ' आणि महेश मांजरेकर यांचा 'जुन फर्नीचर' हा चित्रपट दाखवण्यात येणार आहे. दुपारी एक वाजता 'मदार', ऐतिहासिक असा 'पावनखिंड' आणि 'कारखानिसांची वारी' हे चित्रपट दाखवले जाणार आहे. दुपारी तीन वाजता राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त 'वाळवी', 'जग्गू आणि ज्युलिएट', आणि राज्य पुरस्कार प्राप्त 'वाय' हे चित्रपट दाखविले जाणार असल्याची घोषणा मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केली.

हे सर्व चित्रपट सामाजिक, ग्रामीण, ऐतिहासिक, पर्यावरएण विषयक, स्त्री जीवनाविषयक प्रश्न मांडणारे, बालचित्रपट, विनोदी, ॲक्शन, व्यावसायिक यशस्वी झालेले चित्रपट असून चित्रपट रसिकांना हे सर्व चित्रपट विनामूल्य पाहता येतील. याकरिता ऑनलाईन नाव नोंदणी सुरू करण्यात आली असून कार्यक्रमस्थळी ऑफलाईन नावनोंदणी देखील सुरू आहे.

२२ एप्रिल रोजी १२ ते दोन वाजेपर्यंत ख्यातनाम संगीतकार कौशल इनामदार यांची 'काल-आज-उद्याचे मराठी चित्रपट गीत-संगीत' शब्द, सूर आणि तंत्र या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. दुपारी तीन वाजता दिग्दर्शक हंसल मेहता यांची मुलाखत अभिनेते आणि कवी किशोर कदम घेतील.

सायंकाळी सहा वाजता चित्रपटाचे तंत्र आणि सध्याच्या संधीं या विषयावरील परिसंवाद आयोजित करण्यात आला असून यामध्ये उज्वल निरगुडकर, पंकज सोनावणे, सुप्रिया पाटणकर सहभागी होणार असून सौमित्र पोटे संवादक असतील.

२३ एप्रिल रोजी दु.१२ वाजता सिने पत्रकारांसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आली असून जेष्ठ पत्रकार श्रीकांत बोजेवार, गणेश मतकरी हरी मृदुल मार्गदर्शन करतील. सूत्रसंचालन डॉ.संतोष पाठारे करतील. दुपारी तीन वाजता भारतीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर मराठी चित्रपटांचे स्थान या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला असून यामध्ये जेष्ठ समीक्षक अशोक राणे, नितीन वैद्य, गजेंद्र अहिरे, मृणाल कुलकर्णी सहभागी होणार आहे. मनीषा कोरडे संवादक असतील.

संध्याकाळी सहा वाजता मराठी चित्रपटांचे प्रसारण,प्रसिद्धी वितरण या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला असून यामध्ये रोहन म्हापूस्कर, दिग्पाल लांजेकर, श्रीकांत भिडे, नानूभाई जयसिंगांनी, सादिक चितळीकर, गणेश गारगोटे, अमृता माने सहभाग घेतील. संवादक अमित भंडारी असतील.

२४ एप्रिल रोजी दु. एक वाजता मराठी चित्रपटांचे व्यावसायिक गणित या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला असून यामध्ये जेष्ठ दिग्दर्शक महेश मांजरेकर, रवी जाधव, श्रीरंग गोडबोले, अभिजित पानसे सहभागी होणार असून विजू माने संवादक असतील. दुपारी ३ वाजता ''कालचा आजचा आणि उद्याचा मराठी चित्रपट आणि ओटीटी व्यवसायाचे गणित '' या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे.

या परिसंवादामध्ये आदिनाथ कोठारे, जयंत सोमळकर, सुऱ्हद गोडबोले, वरुण नार्वेकर, अर्चना बोराडे, रोहन कानवडे, महेंद्र तेरेदेसाई सहभागी होणार आहेत. सायंकाळी सहा वाजता समारोप सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

***

# ज्ञानेश्वरीचा सुरेल सोहळा

**ज्योतिर्मय साहित्य**

योगी पावन मनाचा। साही अपराध जनाचा।
विश्व रागे झाले वन्हि। संते सुखे व्हावे पाणी।
शब्द शस्त्रे झाले क्लेश। संती मानावा उपदेश।
विश्वपट ब्रह्म दोरा। ताटी उघडा ज्ञानेश्वरा।




''प्रत्येकाच्या जीवनात अध्यात्मिक तेजाचे दीपप्रज्वलित करत संपूर्ण विश्वासाठी पसायदानरूपी विश्वप्रार्थना लिहिणारे श्री संत ज्ञानेश्वर महाराज अवघ्या विश्वाचे माऊली बनले. भगवद्गीतेतला विचार सर्वसामान्यांपर्यंत पोचवण्यासाठी ज्ञानेश्वरी लिहिणारे आणि पसायदानासारखी अजोड कलाकृती जगाला देणारे संत ज्ञानेश्वर आणि त्यांच्या कुटुंबाची चरित्रगाथा 'संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई' चित्रपटाच्या माध्यमांतून महाराष्ट्राच्या घराघरांत पोहचणार आहे. माउलींचे समता, बंधुतेचे विचार आणि आचरण यांचे आदर्श उलगडून दाखवतानाच प्रेक्षकांना दिव्यत्वाचे दर्शनही अनुभवायास मिळणार आहे. दिग्पाल लांजेकर लिखित-दिग्दर्शित हा भव्य चित्रपट १८ एप्रिलला आपल्या भेटीला येतोय. रेश्मा कुंदन थडानी यांनी या चित्रपटाची निर्मिती केली असून चित्रपटाची प्रस्तुती ए.ए.फिल्म्स ही नामांकित वितरण संस्था करीत आहे.

नुकताच या चित्रपटाचा हृदय संगीत सोहळा ज्येष्ठ गायक सुरेश वाडकर यांच्या हस्ते संपन्न झाला. 'न भूतो न भविष्यती' असा जिवंत संगीत सोहळा मी पहिल्यांदाच अनुभवाला प्रत्येकाच्या मनात संत ज्ञानेश्वरांची प्रतिमा असतेच त्या प्रतिमेला परत उजाळा देत जिवंत करण्याचे काम या सुरेल सोहळ्याने केले असे सांगत ज्येष्ठ गायक सुरेश वाडकर यांनी चित्रपटाला शुभेच्छा दिल्या.

रंगलेल्या या स्वरयज्ञात गायकांनी सुरेल आवाजात गीते सादर करून ज्ञानेश्वर चरित्राची अनुभूती दिली. शेकडो श्रोत्यांच्या उपस्थितीत भक्तिपूर्ण वातावरणात ज्ञानेश्वरीचा हा आनंद सोहळा रंगला. ज्ञानेश्वरीच्या सर्व गीतांच्या सादरीकरणांमध्ये श्रोते रममाण होऊन गेले होते. तर काही गीतांच्या सादरीकरणाच्या वेळी श्रोत्यांचे डोळे पाणावले. पसायदानाच्या अलौकिक अनुभूतीला श्रोत्यांनी भरभरून दाद दिली. या सुमधुर गीतांच्या सादरीकरणासोबतच संत ज्ञानेश्वरांच्या गाथेतील काही प्रसंग ही यावेळी सादर करण्यात आला. एकाहून एक सरस एक अभंगांनी वातावरण भक्तिमय होत गेले. कार्यक्रम असा उत्तरोत्तर रंगत असताना मनावर विशेषत्वाने ठसा उमटला तो पसायदानाच्या अलौकिक अनुभूतीने. या सगळ्या अभंगांचं निरूपण करत असताना ज्ञानेश्वरांचं चरित्र,त्यांची शैली, तिचे अनेकविध पैलु याबद्दल अतिशय मनमोकळा संवाद साधत दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर यांनी या सोहळ्यात वेगळंच चैतन्य आणलं.

या चित्रपटाच्या संगीताची जबाबदारी अवधूत गांधी, यांनी तर संगीत वितरणाची जबाबदारी झी म्युझिकने सांभाळली आहे.


परस्परांशी आर्त जिव्हाळ्याने बांधलेल्या आणि जगण्याचे एकच प्रयोजन असलेल्या भावंडांचे नाते कसे असावे हे दाखवतानाच व्यवहाराची थोर शिकवण शब्दाशब्दांतून देत असतानाच भक्तीचे रहस्य या भावंडांनी सहज उलगडून दाखविले. वैयक्तिक आत्मोद्धाराला लोकोद्धाराची जोड देऊन आत्मकल्याण आणि विश्वकल्याण साधावे हे सर्व तत्वज्ञान या भावंडांच्या पदोपदी प्रत्ययास येते. विश्वाला मांगल्य प्रदान करणाऱ्या या भावंडांचे अजोड कार्य व विचार आजच्या पिढीला प्रेरणा देणारे व्हावेत, या उद्देशाने 'संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई' चित्रपटाचा विषय हाती घेतल्याचे दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर सांगतात.

# 'झापुक झुपूक चं रोमॅंटिक गाणं पोराचा बाजार उठला रं प्रेक्षकांच्या भेटीला !!

**ज्योतिर्मय साहित्य**

जिओ स्टुडिओज प्रस्तूत आणि केदार शिंदे दिग्दर्शित 'झापुक झुपूक' सिनेमा लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नुकतच या सिनेमाचं शीर्षक गीत रिलीझ करण्यात आलं होतं ज्याला प्रेक्षकांनी भरभरून प्रतिसाद दिला. आता पुन्हा एकदा सिनेप्रेमींना भुरळ घालायला 'झापुक झुपूक' चित्रपटाचं नवं रोमॅन्टिक गाणं पोराचा बाजार उठला रं प्रेक्षकांच्या भेटीला आलं आहे.

सूरज चव्हाण ,जुई भागवत आणि इंद्रनील कामतवर चित्रीत या गाण्यात या तिघांचा रोमॅन्टिक अंदाज पहायला मिळतोय. गाण्यात प्रेमाचा त्रिकोण आपण पाहू शकतो. अभिनेत्री जुई वर सूरज आणि इंद्रनीलचा जीव जडलाय. जुईची दोघांसोबत अफलातून केमिस्ट्री पहायला मिळते जी खूप सुंदर



दिसत आहे. पण विशेष म्हणजे जुई चा शिफॉन सारी मधला कातिल लूक आकर्षणाचा विषय ठरतोय. या गाण्याचे बोल आणि त्याची चाल प्रेक्षकांना खिळवून ठेवतेय. गाण्याचा हुकस्टेप सुद्धा सर्वांना थिरकवणारा आहे. कलाकार आणि संगीत सोबतच या गाण्याचं चित्रीकरण सुद्धा तितकच सुंदर आहे. ह्या गाण्याला करण सावंत ह्यांनी गायलं आहे. तर संगीत आणि बोल कुणाल करण ह्यांचं आहे.

पोराचा बाजार उठला रं हे गाणं रसिकांच्या मनाला भिडणारं आहे. गाणं पाहून सिनेरसिकांची 'झापुक झुपूक' सिनेमाबद्दलची उत्सुकता आणखी वाढली आहे. या चित्रपटात एक से बढकर एक इतर उत्कृष्ट कलाकार आहेत जसे हेमंत फरांदे, पायल जाधव, दीपाली पानसरे, तसेच पुष्कराज चिरपुटकर, मिलिंद गवळी जे मुख्य भूमिकेत झळकणार आहेत.

जिओ स्टुडिओज् प्रस्तुत, केदार शिंदे प्रोडक्शन्स निर्मित, निर्माती ज्योती देशपांडे, निर्माती सौ. बेला केदार शिंदे ,केदार शिंदे दिग्दर्शित ''झापुक झुपूक'' सिनेमा २५ एप्रिल पासून प्रदर्शित होणार आहे !!

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559